# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 22 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २२ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- पंतप्रधान मोदी यांना कुवेतचा 'ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर' हा सर्वोच्च सन्मान प्रदान
- संपूर्ण समाजात सलोखा निर्माण होण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार – सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट
- चांगलं आणि उत्तम शिक्षण देणं हे ध्येय : शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे

आणि

- १९ वर्षांखालील मुलींच्या आशिया चषक क्रिकेट टी-ट्वेंटी स्पर्धेचं भारताला विजेतेपद

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कुवेतच्या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे. कुवेतचे अमीर, हिज हायनेस शेख मशाल अल-अहमद अल-जाबेर अल-सबा यांनी आज पंतप्रधानांना कुवेतचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार "ऑर्डर ऑफ मुबारक अल-कबीर" प्रदान केला. कुवेतचे पंतप्रधान हिज हायनेस शेख अहमद अल-अब्दुल्ला अल-अहमद अल-सबा देखील उपस्थित होते. पंतप्रधानांनी हा पुरस्कार भारत आणि कुवेत यांच्यातील दीर्घकालीन मैत्रीला, कुवेतमधील भारतीय समुदायाला आणि एक अब्ज चाळीस लाख भारतीय नागरिकांना अर्पण केला. ४३ वर्षांनंतर भारताच्या पंतप्रधानांच्या कुवेतच्या ऐतिहासिक भेटीवेळी प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्काराला विशेष महत्त्व आहे. हा पुरस्कार १९७४ पासून प्रदान करण्यात येत असून तो निवडक जागतिक नेत्यांना देण्यात येतो. पंतप्रधान मोदी

यांना प्राप्त झालेला हा विसावा आंतरराष्ट्रीय सन्मान असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

****

दरम्यान, आपल्या दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यात काल मोदी यांनी एका विशेष कार्यक्रमात कुवेतमधील भारतीय जनसमुदायाला संबोधित केलं. कुवैतच्या विकासात आणि भारत–कुवैत संबंधांच्या मजबूतीकरणात भारतीयांची मोठी भूमिका राहिली असल्याचं त्यांनी म्हटलं. भारतीय समुदायाला प्रवासी भारतीय दिवस आणि पुढील महिन्यात आयोजित होणाऱ्या महाकुंभ मेळ्यात सहभागी होण्याचं आमंत्रणही पंतप्रधान मोदी यांनी यावेळी दिलं. पंतप्रधानांनी आपल्या या दौऱ्यात १०१ वर्षीय भारतीय परराष्ट्र सेवेतले माजी अधिकारी मंगल सैन हांडा यांची भेट घेतली. २६व्या अरेबियन गल्फ चषक फुटबॉल स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यालाही पंतप्रधान मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी कुवैतच्या नेत्यांसोबत अनौपचारिक चर्चा केली.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज अहिल्यानगर दौऱ्यावर आहेत. त्यांच्या आगमनाप्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं. हिवरे बाजार इथं एका खासगी कार्यक्रमाला मुख्यमंत्र्यांनी हजेरी लावली असता, हिवरे बाजार ग्रामस्थांच्या वतीनं मानपत्र देऊन मुख्यमत्र्यांचा सन्मान करण्यात आला.

****

संपूर्ण समाजात सलोखा निर्माण होण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचं, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलत होते. उद्या बीड आणि परभणी इथं आपण असून, तिथं घडलेल्या दोन्ही घटनांचा बारकाईनं अभ्यास करुन, सत्य परिस्थितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर करणार असल्याचं शिरसाट यांनी सांगितलं.

दरम्यान, बहुजन विकास, नवीकरणीय ऊर्जा आणि दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांचं आज मंत्रीपद मिळाल्यानंतर प्रथमच छत्रपती संभाजीनगर शहरात आगमन झालं. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांचं जल्लोषात स्वागत करुन फेरी काढण्यात आली. शहरातल्या क्रांती चौक इथं फेरीची सांगता होऊन, सावे यांची मिठाईनं तुला करण्यात आली.

****

शिक्षण खात्यातील कामाचा सकारात्मक निकाल दिसेल, असं प्रतिपादन राज्याचे नुतन शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केलं आहे. मालेगाव बाह्यचे आमदार असलेल्या भुसे यांचं आज मालेगांव इथं आगमनानंतर भव्य स्वागत करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे शालेय शिक्षणमंत्रीपद अत्यंत आव्हानात्मक आहे मात्र, इथंही आपण प्रभावीपणे काम करताना दिसू, असे ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी शिक्षण खातं जिव्हाळ्याचं आहे. शालेय शिक्षण मंत्री तसंच अधिकारी ग्रामीण भागावर लक्ष केंद्रित करून काम करतील, असं त्यांनी नमूद केलं. गरिबातील गरीब मुलांना चांगलं आणि उत्तम शिक्षण देणं हे ध्येय असल्याचं भुसे म्हणाले. नाशिकच्या पालकमंत्रीपदाबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री आपल्या दृष्टीनं सकारात्मक निर्णय घेतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

****

नाशिक जिल्ह्यासह अनेक भागात कांद्याचा प्रश्न चर्चेत असून कांद्यासंदर्भात निश्चीत धोरण ठरवण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल असं कृषी खात्याचे मंत्री विधिज्ञ माणिक कोकाटे यांनी म्हटलं आहे. मंत्रीपद स्वीकारल्यानंतर ते आज नाशिक इथं आले असता त्यांचं स्वागत करण्यात आलं. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. कृषी खातं अत्यंत आव्हानात्मक असून कृषी मंत्री ही फार मोठी जबाबदारी आहे. वातावरणात होणारे बदल तसंच शेतीमालाच्या भावावर होणारा परिणाम, वीज आणि अन्य प्रश्नांवर आपण काम करणार असल्याचंही मंत्री कोकाटे यावेळी म्हणाले.

****

बीड जिल्ह्यातले कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न सोडवण्याला आपण प्राधान्य देणार आहोत, असं जिल्ह्यात नव्याने रुजू झालेले पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी नमूद केलं आहे. माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना त्यांनी आज ही माहित दिली. मस्साजोग इथल्या खुनाच्या प्रकरणात गुन्हा दाखल झालेला असून या संदर्भातला तपास तसंच उर्वरित शिल्लक कामं आपण पूर्ण करणार आहोत. लवकरच या संदर्भातले निकाल आपल्याला दिसतील. पोलिसांना सर्व तपासांमध्ये पूर्ण यश मिळावं तसंच जिल्ह्यातली कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधित रहावी, यासाठी नागरिकांनी सहकार्य करावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. त्यांनी

काल रात्री पावणे अकरा वाजेच्या सुमारास पदभार स्वीकारला. शासनानं आपल्यावर खूप मोठी जबाबदारी दिली असून जिल्ह्यातली कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती हे आपल्यासमोर आव्हान असल्याचं ते म्हणाले. बीड जिल्ह्यातल्या अडचणींसंदर्भात नागरिक आपल्याला केंव्हाही भेटू शकतात, असंही पोलिस अधिक्षक कॉवत यावेळी म्हणाले.

****

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून रविचंद्रन अश्विन यानं निवृत्ती जाहीर केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याला भावनिक पत्र लिहून त्याच्या कामगिरीचं कौतुक केलं आहे. क्रिकेट आणि देशासाठी अश्विननं दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल पंतप्रधानांनी त्याचे आभार मानले आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये घेतलेले ७६५ बळी आणि कसोटीत सर्वाधिक मालिकावीर पुरस्कार या अश्विनच्या विक्रमाचा विशेष उल्लेख करताना मोदी यांनी त्याच्या गोलंदाजीतली विविधता आणि प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवण्याच्या क्षमतेची प्रशंसा केली आहे. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या या पत्रात अश्विनच्या १४ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतल्या महत्त्वाच्या क्षणांचा उल्लेख केला असून त्याची ही कारकिर्द भविष्यातल्या पिढ्यांना प्रेरणा देईल अशी आशा व्यक्त केली आहे.

****

पालघर जिल्ह्यातल्या वाडा तालुक्यातल्या खानिवली ग्रामपंचायतीनं आपलं गाव प्लास्टिक मुक्त व्हावं, गावातलं पर्यावरण अबाधित रहावं त्यासोबतच गावातल्या महिलांना रोजगाराच एक नवीन साधन उपलब्ध व्हावं या उद्देशानं आदर्श उपक्रम राबवला आहे. या गावात प्लास्टिक घनकचरा व्यवस्थापनासाठी एक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु केला आहे. यामुळे गाव प्लास्टिक मुक्त तर होतंच आहे त्यासोबतच गावातल्या महिलांना रोजगाराची एक नवी संधी देखील उपलब्ध झाली आहे.

खानिवली ग्रामपंचायतीनं मुंबईच्या रोटरी क्लबच्या माध्यमातून मिळालेल्या निधीतून गावात उभारलेल्या यंत्रणेतून प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया सुरू केली आहे. यामुळे परिसर प्रदूषण मुक्त होत आहे तसंच महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

****

राज्यात सरत्या वर्षाच्या शेवटापर्यंतच्या आठ दिवसांच्या कालावधीत बहुतांश भागात वातावरण काही अंशी ढगाळ असणार आहे तर काही ठिकाणी तुरळक पावसाचीही अंशत: शक्यता आहे. मात्र, देशाच्या उत्तरेकडील बहुतांश पर्वतीय

भागात थंडीची तीव्र लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे.

****

भारतानं १९ वर्षांखालील मुलींच्या आशिया चषक क्रिकेट टी-ट्वेंटी स्पर्धेत बांग्लादेशला पराभूत करत अजिंक्यपद पटकवलं आहे. मलेशियाच्या क्वालालंपूर इथं आज सकाळी झालेल्या अंतिम सामन्यात, बांग्लादेश संघानं नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी केली. भारतानं वीस षटकांत सात बाद ११७ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांग्लादेशचा डाव एकोणीसाव्या षटकाचे तीन चेंडू शिल्लक असतांना ७६ धावांवर आटोपला. सामनावीरचा पुरस्कार भारताची सलामीवीर फलंदाज गोंगादी तृषा हिला देण्यात आला. अशिया खंडातील आघाडीच्या सहा संघांचा समावेश असलेल्या या स्पर्धेत भारतानं आपले सर्व सामने जिंकण्याची किमया साधली.

****

स्वच्छ नवी मुंबई अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत आज सहा हजारांहून अधिक नागरिकांनी सहभाग घेत स्वच्छतेचा संदेश दिला. नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे तसंच राज्य पोलीस दलाच्या फोर्स वनचे प्रमुख कृष्णप्रकाश यांनीही या स्पर्धेत सहभाग घेऊन नागरिकांना प्रोत्साहन दिलं. दिडशेहून अधिक तृतीयपंथी नागरिक, पन्नासहून अधिक दिव्यांग, तसंच अंध व्यक्ती यांनीही विविध गटांत सहभाग नोंदवला. शाळकरी विद्यार्थी, युवक यात मोठ्या संख्येनं सहभागी झाले. अक्षय पडवळ, ओंकार बी. यांनी पुरुष गटातली तर सुजाता माने, कोमल खांडेकर यांनी महिला गटांतली विजेतेपदे पटकावली.

****

भारतीय महिला क्रिकेट संघानं वेस्टइंडीजविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ३१५ धावांचं मोठं आव्हान ठेवलं आहे.

****